महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

news.thanejeevandeep@gmail.com

Rs.2/-

रविवार • ९ फेब्रुवारी २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक २२५ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# दिल्लीत भाजपाची सत्ता, आपचा दारुण पराभव



दिल्लीत २७ वर्षांनंतर भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, भाजपाने एकूण ४८ जागांवर आघाडी घेत बहुमत मिळवले आहे. तर आम आदमी पार्टीच्या २२ जागा आल्या असून दारुण पराभव झाला आहे. आणि काँग्रेसला एकाही जागेवर यश मिळालेले नाही.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

दिल्ली : दिल्लीत २७ वर्षांनंतर भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, भाजपने एकूण ४८ जागांवर आघाडी घेतली आहे. तर सत्ताधारी आम आदमी पार्टीने देखील 22 जागा जिंकल्या आहेत. काँग्रेसला एकही जागा मिळालेली नाही. २०१५ पासून दिल्लीत सत्तेत असलेल्या आम आदमी पक्षाचा पराभव केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील आनंदित झाले आहेत. या निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा विकास आणि सुशासनाचा विजय असल्याचे म्हटले. यासोबत भाजपच्या विजयानंतर पंतप्रधान मोदींनी दिल्लीकरांना गॅरंटी देखील दिली आहे. भाजपने २७ वर्षांनंतर दिल्लीत पुनरागमन केलं आहे. दुसरीकडे आम आदमी पक्षाला मोठ्या पराभवाला सामोरे जावं लागले आहे. दिल्ली निवडणुकीत आम आदमी पक्षाचा दारुण पराभव झाला असून पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन, सौरभ भारद्वाज आणि इतर अनेक बडे नेतेही पराभूत झाले आहेत. आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी पराभव स्वीकारला असून आपण लोकांसाठी काम करत राहू असे म्हटले आहे. दुसकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कार्यकर्त्यांचे अभिनंदन करत दिल्लीकरांना महत्त्वाची गॅरंटी दिली आहे.

"आम्ही दिल्लीच्या सर्वांगीण विकासासाठी आणि इथल्या लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही ही आमची गॅरंटी आहे. यासोबतच विकसित भारताच्या उभारणीत दिल्लीची महत्त्वाची भूमिका आहे, हे आम्ही सुनिश्चित करू.


दिल्लीत पुन्हा कमळ फुलणार, भाजप उमेदवाराला विश्वास "जसा देश विकसित भारत बनत आहे, त्याचप्रमाणे दिल्लीतही कमळ फुलणार आहे. आपची हॅटट्रिक होणार नाही." असे दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निकालावर भाजप नेते आणि मालवीय नगरचे उमेदवार सतीश उपाध्याय म्हणाले

मला आमच्या सर्व भाजप कार्यकर्त्यांचा अभिमान आहे, ज्यांनी या जनादेशासाठी रात्रंदिवस काम केले. आता आम्ही आमच्या दिल्लीकरांच्या सेवेसाठी आणखी मजबुतीने काम करत राहू," असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

आम्ही राजकारणात सेवा करण्यासाठीच आलो आहोत - अरविंद केजरीवाल "दिल्लीच्या जनतेने भाजपाला ज्या गोष्टींसाठी मतं दिली आहेत ती भविष्यात नीट पार पाडली जातील. गेल्या १० वर्षात आमच्या पक्षाने प्रत्येक क्षेत्रात कार्यरत राहून दिल्लीचा विकास केला. दिल्लीकरांना सर्व सोयीसुविधा देण्याचा आमचा प्रयत्न राहिला. दिल्लीतील पायाभूत सुविधा सुधारण्यावरही आम्ही काम केले. आता आम्ही विरोधी पक्षाची भूमिकाही चोखपणे पार पाडू. दिल्लीकरांच्या सुख-दुःखात आम्ही त्यांच्या सोबत असू. आम्ही राजकारणात सेवा करण्यासाठीच आलो आहोत. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी निवडणुकीसाठी घेतलेल्या कष्टासाठी त्यांचे आभार," अशी प्रतिक्रिया अरविंद केजरीवाल यांनी दिली.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा सुपडा पुन्हा एकदा साफ झाला आहे. त्यामुळे भाजपाच्या विजयापेक्षाही काँग्रेसच्या पराभवाची जास्त चर्चा होऊ लागली आहे.

१. इंडिया आघाडीत एकत्र असूनही काँग्रेसनं आपविरोधात आक्रमक प्रचार केला होता.
२. आप आणि काँग्रेसमध्ये जागावाटपाच्या मुद्द्यावर बोलणी फिसकटली
३. आपनं दिल्ली निवडणुकीत काँग्रेसकडे पाठिंबा मागितला होता. पण नंतर त्याला नकार दिला.
४. काँग्रेस नेत्यांनी आप हाच दिल्लीतील प्रमुख विरोधी पक्ष मानला.
५. इंडिया आघाडीला कमकुवत करण्यासाठी आपच्या नेत्यांनी काँग्रेसला जबाबदार धरलं.
६. आपनं काँग्रेसवर भाजपाला फायदा व्हावा अशा पद्धतीने मतांचं ध्रुवीकरण केल्याचा आरोप केला.
७. आप आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष एकाच प्रकारच्या मतदार वर्गासाठी प्रयत्न करत होते.
८. आप आणि काँग्रेस यांच्यातील वादाचा शेवटी भाजपाला फायदा झाल्याचं दिसतंय.



दिल्लीतल्या ऐतिहासिक विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या मुख्यालयातून कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. तसेच आप आणि काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अरविंद केजरीवाल यांना इशारा देखील दिला आहे. भ्रष्टाचाराच्या प्रत्येक प्रकरणाची चौकशी होणार असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत तीन दशकांनंतर विजय मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाकडून मोठं सेलिब्रेशन केलं जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी संध्याकाळी ७ वाजता दिल्ली भाजपा मुख्यालयात या सेलिब्रेशनसाठी उपस्थित राहणार असल्याचंही सांगितलं जात आहे.

भ्रष्टाचाराविरोधातील चळवळीतून जन्माला आलेला पक्ष भ्रष्टाचारातच अडकला. ज्यांनी स्वतःला प्रामाणिकपणाचे दाखले दिले ते स्वतःच भ्रष्टाचारी निघाले. हा दिल्लीकरांच्या भरवशाचा विश्वासघात होता. दारू घोटाळ्यामुळे दिल्लीची बदनामी झाली. जेव्हा जग कोरोनाशी लढत होते, तेव्हा आपचे लोक शीशमहल बांधत होते. या आपदावाल्यांनी त्यांचा प्रत्येक घोटाळे लपवण्यासाठी रोज नवीन षडयंत्र रचले. पण आता दिल्लीचा जनादेश आला आहे. मी गॅरंटी देत आहे की पहिल्या विधानसभा अधिवेशनातच कॅगचा अहवाल सभागृहात ठेवला जाईल. भ्रष्टाचाराच्या प्रत्येक प्रकरणाची चौकशी होणार आहे. ज्याने लूट केली आहे ती परत करावी लागेल," असा इशारा पंतप्रधान मोदींनी दिला.

# उद्धव ठाकरे महाविकास आघाडीतून बाहेर पडणार?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांनी दिल्लीतील आपच्या पराभवानंतर चिंता व्यक्त केली आहे. त्यामुळे आता उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीत रहायचे नाही यावर आता पक्षाच्या इतर नेत्यांशी बोलून एकत्र काम करायचे का नाही याचा विचार करावा लागेल असे ठाकरे यांनी आपल्याशी चर्चा करताना म्हटल्याचे शिवसेना नेते संजय राऊत यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीतून बाहेर पडणार असल्याचे म्हटले जात आहे.

दिल्लीत आपचा मोठा पराभव झाला आहे. आप आणि काँग्रेस स्वतंत्र लढल्याने हा पराभव झाल्याचे म्हटले जात आहे. या प्रकरणात काश्मीरचे नॅशनल कॉन्फरन्सचे नेते कश्मीर नेते उमर अब्दुल्ला यांनी दिल्लीतील आपच्या पराभवानंतर अजून भांडत बसा असा टोमणा काँग्रेस पक्षाचे नेते राहूल गांधी यांना लगावला आहे. त्यानंतर आता शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांनी देखील इंडिया आघाडीच्या या कामगिरीवर नाराजी व्यक्त केली असे संजय राऊत म्हणाले. दोन पक्ष एकत्र आले असते तर.. केजरीवाल यांना जनतेने 10 वर्ष निवडून दिल आहे. भ्रष्टाचार विरोधी आंदोलनातून आलेला एका पक्षाने सत्ता घेतली. मतदार याद्यातून हजारो नाव गायब केली आहेत. दिल्लीतील रिकामे बंगले आहेत त्यात कोणी राहत नाही त्यांचे नाव नोंदवले आहे. केजरीवाल हरले या पराभवाचं मुख्य कारण काँग्रेस आणि आप वेगवेगळे लढले आहे. आमच्या इंडिया ब्लॉक मधील दोन पक्ष एकत्र आले असते तर निकाल वेगळा लागला आसता. फरक फार मोठा नाही असे उद्धव ठाकरे यांनी म्हटल्याचे संजय राऊत यांनी सांगितले. राहुल गांधी यांच्यासोबत असताना मी काल सांगितलं, महाराष्ट्र पॅटर्न दिल्लीत राबवला. जसा लातूर पॅटर्न राबवला तसा राबवला.... आता लातूर पॅटर्न कुठे आहे, राजकारणात 'अघोरी पॅटर्न' काही काळ चालतो. महाकुंभमध्ये मोदी गेले, तसेच कन्याकुमारी कुठे कुठे जातात मतदानाच्या दिवशी जातात, मी किती कडवट हिंदू आहे हे दाखवायचा प्रयत्न आहे. धर्माची अफूची गोळी द्यायची असा प्रकार सुरु आहे असेही संजय राऊत म्हणाले. ठाकरे यांनी चिंता व्यक्त केली ध्यानस्थ बसलेले पण कॅमेरे लागलेले आहेत. हे लोकांनी पहावं मतदान करावं. ह्या वेळी नरेंद्र मोदी आणि अमित शहा या दोघांनी ठरवले होते, पडेल ती किंमत देऊन केजरीवाल यांचा पराभव करुच... खोटे मतदान केलं. महाराष्ट्रात देखील हे घडलं पण आमच्या उशीरा लक्षात आले असेही संजय राऊत म्हणाले. दिल्लीच्या निकालाबाबती उध्दव ठाकरे यांनी चिंता व्यक्त करीत नव्याने विचार करावा लागेल सर्वांशी बोलते बोलतील असे संजय राऊत यांनी सांगितले.





दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने स्पष्ट बहुमत मिळवून दिल्लीत सत्ता काबीज केल्याबद्दल आमदार किसन कथोरे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी या विजयाचा जल्लोष करत आनंदोत्सव साजरा केला.यावेळी भारतीय जनता पार्टीचे ठाणे जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष जितेंद्र डाकी, माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे , शरद तेली यांच्यासह महिला व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रतिक्रिया

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सबका साथ सबका विकास या विकास धोरणास दिल्लीकरांनी साथ दिली. दिल्लीच्या मतदारांचे मनःपूर्वक आभार व भारतीय जनता पार्टी केंद्रीय कार्यकारिणीचे या यशाबद्दल मनःपूर्वक कौतुक - आ. किसन कथोरे

# ठाणे जिल्ह्यात दहावी व बारावी विद्यार्थ्यांसाठी परीक्षा केंद्रांची व्यवस्था

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे – महाराष्ट्र राज्य माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या परिक्षा ११ आणि २१ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. ठाणे जिल्ह्यात दहावीच्या परीक्षेसाठी ३३८ तर बारावीच्या परीक्षेसाठी १९७ परीक्षा केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी भरारी पथकाची नजर असणार आहे. शिवाय ज्या परीक्षा केंद्रावर संशयास्पद हालचाली होतील त्या केंद्राची मान्यता कायमची रद्द करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

ठाणे जिल्ह्यात दहावीकरिता ३३८ परीक्षा केंद्रे असून १ लाख ३ हजार ७१८ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. तर बारावी परीक्षेकरिता १९७ परीक्षा केंद्रे असून १ लाख २१ हजार २४४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट आहेत. परीक्षा कामकाज २० परिरक्षक केंद्रांमार्फत होणार आहे. परीक्षा कॉपीमुक्त व्हावी यासाठी शिक्षण विभागाअंतर्गत भरारी पथक तसेच आवश्यकतेप्रमाणे बैठे पथक नियुक्त करण्यात आले आहे. याशिवाय तालुका तसेच पालिका स्तरावर स्वतंत्रपणे पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. महसूल विभागांतर्गत जिल्हाधिकारी भरारी पथके नेमण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त जिल्हा स्तरावरील खातेप्रमुखांनी परीक्षा केंद्रांना भेटी देण्यासंदर्भात नियोजन केले आहे. परिक्षादरम्यान कॉपी अथवा इतर गैरप्रकार निदर्शनास आल्यास अशा विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थी तसेच पालकांनी दक्षता घ्यावी, त्याचप्रमाणे परीक्षा केंद्रावर गैरप्रकार निदर्शनास आल्यास परीक्षा केंद्र कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल अशा सूचना प्रशासनामार्फत देण्यात आलेल्या आहेत. परिक्षा केंद्रावर केंद्र संचालक आणि पर्यवेक्षक म्हणून काम करणाऱ्या शिक्षकांची डिजिटल उपस्थिती घेण्यात येणार आहे. याशिवाय जिल्ह्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र परिसरामध्ये आवश्यकता असल्यास जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेर्याद्वारे परीक्षा केंद्राची निगराणी करण्यात येईल. परीक्षा सुरू होण्याअगोदर परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध असण्याबाबत दक्षता घेण्यात येणार आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या बाहेर प्रशासनामार्फत आवश्यकतेनुसार व्हिडिओ चित्रीकरण करण्यात येईल. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहेत तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात आवश्यकतेप्रमाणे १४४ कलम लागू करण्यात येईल अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

# गीतासार



त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।
निर्द्वन्द्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥२- ४५॥


हे अर्जुना, वेद वर सांगितल्याप्रमाणे तिन्ही गुणांची कार्ये असणारे भोग आणि त्यांची साधने सांगणारे आहेत. म्हणून तू ते भोग व त्यांच्या साधनांच्या बाबतीत आसक्ती बाळगू नकोस. तसेच सुख-दुःखादी द्वंद्वांनी रहित नित्यवस्तू असणाऱ्या परमात्म्यात स्थित, योगक्षेमाची इच्छा न बाळगणारा आणि अंतःकरणाला ताब्यात ठेवणारा हो. ॥ २-४५ ॥

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥२- ४६॥

सर्व बाजूंनी भरलेला मोठा जलाशय मिळाल्यावर लहान जलाशयाची मनुष्याला जेवढी गरज असते, तेवढीच गरज चांगल्या प्रकारे ब्रह्म जाणणाऱ्या ब्रह्मज्ञान्याला वेदांची उरते. ॥ २-४६ ॥

## किचन टिप्स

## फोडणी देताना...



फोडणी देताना कोणते भांडे वापरावे किंवा वापरू नये, भाजी, आमटी, कोशिंबीर करताना फोडणी कशी द्यायची हे जाणून घेऊ या...

१) फोडणी देतानाचे भांडे किंवा कढई शक्यतो जाड असले पाहिजे मग तुम्ही स्टीलची कढई वापरू शकता पण ती जाड आणि ठोक्याची कढई असावी. पातळ स्टीलची कढई वापरू नये कारण त्यामध्ये फोडणी करपते. पितळी कढई कलई करून वापरू शकता किंवा स्टीलमध्ये ट्राय प्लाय कढई वापरू शकतो ज्यामध्ये आत आणि बाहेर स्टीलचे आवरण असते आणि आतमध्ये ॲल्यूमिनिअम असते ज्यामुळे फोडणी करपत नाही, किंवा तुम्ही नॉनस्टीकचे भांडे वापरू शकता.

२) फोडणी देताना गॅस चालू करा आणि कढई ठेवा. गॅस मोठ्या आचेवर नाही तर कमी आचेवर ठेवा आणि भांड्यात लगेच तेल घाला. भांडे जास्त तापत ठेवायचे नाही. तेल टाकताच गॅस मध्यम आचेवर ठेवा आणि तेल तापू द्या.

३) अनेकदा तेल थंड असतानाच मोहरी टाकतात, तसे करू नका. तेल तापल्याशिवाय मोहरी टाकू नका.

४) मोहरी टाकण्याआधी तेल तापले आहे की नाही ते पाहा त्यासाठी २-३ मोहरीचे दाणे टाकून पाहा, ती मोहरी तडकडली मग १ चमचा मोहरी टाका.

५) फोडणी देताना नेहमी आधी मोहरी टाका आणि मग जिरे टाका. जिरे आधी टाकल्यास ते करपते. म्हणून मोहरी चांगली तडकली की जिरे आणि बाकीचे जिन्नस टाका.

६) जिरे फुलले की मग लसून किंवा आले लसून पेस्ट जे काही आवश्यक आहे ते टाका आणि चांगले परतून घ्या. लसून परतल्यानंतर मग त्यात कडीपत्ता टाका. कडीपत्ता टाकल्यानंतर तडतड आवाज आला की फोडणी चांगली होत आहे.

७) जर फोडणीमध्ये मिरची टाकायची असेल तर कडीपत्ता टाकल्यानंतर तुम्ही मिरची टाकू शकता आणि चांगली परतून घ्या.

८) तुम्हाला फोडणीत कांदा घालायचा असेल तर मिरची परतल्यानंतर टाका आणि गुलाबी होईपर्यंत परता.

९) फोडणीत तुम्हाला टोमॅटो हवे असेल तर कांदा गुलाबी झाल्यानंतर फोडणीत टाकू शकता आणि चांगला परतून घ्या.

# उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे यांचा वाढदिवस

## निश्चयाचा महामेरू.. बहुत जनांसी आधारु..

लेखक
रणवीर राजपूत
गवर्नमेंट मिडिया,महाराष्ट्र शासन
(निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी)

भारतीय राजकारणात अनेक नेत्यांना-राज्यकर्त्यांना आपल्या वाडवडीलांचा- पूर्वजांचा राजकीय वारसा लाभला.त्यामुळे ते सहजपणे सत्तास्थानी विराजमान झालेत.मात्र शिवरायांच्या सातारचा एकनाथ हे त्याला अपवाद आहेत. त्यांनी आपल्या कार्यकर्तुत्वावर शून्यातून विश्व निर्माण केलं. त्यांचा नगरसेवक ते मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री हा यशस्वी राजकीय प्रवास नवोदित युवा नेत्यांसाठी पथदर्शक आहे.खरं तर,हीच त्यांच्या यशस्वी राजकीय प्रवासाची यशगाथा होय. मित्रहो,अनाथांचे नाथ - एकनाथ या सातारच्या सुपुत्रानं शिवछत्रपतींच्या कर्मभूमीची माती ललाटी लावून काही तरी करून दाखवावं या उद्देशाने ठाणे या सांस्कृतिक नगरीत पदार्पण केलं अन् बघता..बघता त्यांच्या जीवनास मोठी कलाटणी मिळाली.या शाश्वत घटनेला समस्त ठाणेकर साक्षीदार आहेत.

एकनाथजी यांचा जन्म ९ फेब्रुवारी १९६४ रोजी वंदनीय गंगूबाई आईसाहेब यांच्या उदरी झाला, अन् जणू गोरगरीब, कष्टकरी लोकांचा आश्रयदाता उदयास आला. भाईंच्या वडिलांचे नाव संभाजीराव तर,महाबळेश्वर तालुक्यातील दरे हे त्यांचं मूळगाव.शिवसेना प्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जहाल,परखड अन् ओजस्वी वाणीनं प्रेरित होऊन,तर धर्मवीर आनंद दिघेसाहेब यांच्या भगव्या विचाराच्या शिकवणीने वयाच्या अवघ्या २० व्या वर्षीच त्यांनी शिवसेनेचा भगवा ध्वज हाती घेतला आणि बघता-बघता त्यांचं राजकीय-सामाजिक- आध्यात्मिक जीवन हिंदुत्वमय झालं.

परंतु दुर्दैवानं एक काळा दिवस उजाडला.अन् २००१ मध्ये दिघेसाहेबांचा दुर्दैवाने अपघाती मृत्यू होऊन ठाणेकरांवर दुःखाची अवकळा पसरली.संपूर्ण ठाणे शहर सुन्न झालं.प्रत्येकाला आपल्या घरातील थोरली व्यक्ती गेल्याचे दुःख झालं.त्यानंतर शिवसेनाप्रमुखांनी ठाणे जिल्हा प्रमुखाची जबाबदारी शिंदेसाहेबांना सोपविली.ठाणे जिल्हा शिवसेना प्रमुख पदाचं उत्तरदायित्व यांच्या हाती आलं.गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे यांचा वारसा पूर्णक्षमतेचे चालवत,सर्वांना बरोबर घेऊन मोठ्या आत्मविश्वासाने एकनाथजी राजकारणातून समाजकारण करत आहेत,म्हणजे हीच खरी स्व. दिघेसाहेबांना मानवंदना होय.म्हणतात ना," हर कामियाब इंसान के पीछे औरत का हाथ होता है" हे विधान शिंदेसाहेबांच्या बाबतीत तंतोतंत खरे ठरले आहे.शिंदेसाहेबांच्या पत्नी सौ. लताताई शिंदे ह्या सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्यात.इतकेच नव्हे तर,सुख-दुःखाच्या वाटेकरीही राहिल्या. सौ.लताताई ह्या खऱ्या अर्थाने शिंदेसाहेबांच्या सावली आहेत.आपला सुपुत्र श्रीकांत यास डॉक्टर बनविण्याचं स्वप्न लताताईंनी खरं करून दाखविलं.यास्तव सौ.लताताईंना त्रिवार मानाचा मुजरा!

आपल्या गुरुवर्यांचा आदर्श घेत शिंदेसाहेबांनी महाराष्ट्र-बेळगाव सीमा आंदोलनात अग्रेसर राहून बेल्लारी तुरुंगात ४ महिने कारावास भोगला.त्यांचे महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाविषयी असलेले गांभीर्य पाहून त्यांची पुढे समन्वयक मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली.याशिवाय लोकांच्या न्याय्य मागण्या मान्य करण्यासाठी जनआंदोलनांचे नेतृत्व करताना त्यांनी अनेक गुन्हे आपल्या अंगावर घेतले.जिल्हा प्रमुख म्हणून विविध आव्हानांना समर्थपणे तोंड देत,त्यांनी ठाणे जिल्ह्यात व आसपासच्या क्षेत्रात शिवसेनेचा गड कायमस्वरुपी राखला आहे. संवेदनशीलता,संयम,साहस,निष्ठा अन् संघर्ष हे गुण अंगीकारुन त्यांनी आपलं राजकीय विश्व निर्माण केलं.आम्ही ठाणे जिल्ह्यातले सर्वधर्मीय लोक खरोखर भाग्यवान आहोत की,ज्यांना शिंदेसाहेबसारखा लोकहितवादी नेता मिळाला.

कोरोना महामारीमुळे सारं जग मोठ्या संकटात सापडले असता,नगरविकास मंत्री या नात्याने शिंदेसाहेबांनी ठोस उपाययोजना करून ठाणे व गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून कोरोनाला नियंत्रित करण्यात यश मिळविलं.कोरोना काळातील भाईंनी केलेली रुग्णसेवेची कामे राज्यातील सर्वधर्मीय लोकांच्या आजही स्मरणात आहेत.सुरुवातीच्या काळात पुरेशा आरोग्य सुविधा नव्हत्या,कारण या महामारीवर कोणतीही लस वा औषध जगात उपलब्ध नव्हती. शिंदेसाहेबांच्या संकल्पनेतून साकारलेल्या वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन या द्वय सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून राज्यातल्या सर्वधर्मीय लोकांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली.तसेच कोरोनाविषयक जनजागृती करून लोकांना राज्य सरकारच्या नियमावलीचे तंतोतंत पालन करण्याचे आवाहन केलं.त्यामुळे लोकांनी सावधगिरी बाळगून स्वतःची व आपापल्या कुटुंबांची काळजी घेतली.आतापर्यंत राज्यातील विविध भागांमध्ये सुमारे एक हजाराहून अधिक आरोग्य शिबिरे आयोजित केल्याने लाखों लोकांनी या शिबिरांचा लाभ घेतला.त्यामुळे कोरोना काळात लोकांच्या आरोग्याचे खऱ्या अर्थाने रक्षण झाले.

या महत्वपूर्ण कार्यात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक प्रमुख मंगेश चिवटेसर,कक्षाचे राज्य प्रमुख रामहरी राऊत व सहप्रमुख ज्ञानेश्वर धुळगंडे आणि मदत कक्षाच्या टीमचे मोठे योगदान लाभले असून, रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा हे ब्रीद कृतीनं खरं करून दाखविलं,याचा आम्हा तमाम शिवसैनिकांना सार्थ अभिमान आहे.

राज्यातील लोकांचे आरोग्याचे रक्षण करण्याबरोबरच त्यांना पंचतारांकित दळणवळणच्या पायाभूत सुविधा देण्यासंदर्भात देखील शिंदेसाहेब हे सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) म्हणून पूर्णक्षमतेने कृतिशील राहिले.राज्यातील रस्त्यांचा विकास,त्यांचं बांधकाम अन् देखरेखीसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कार्यरत आहे.

एवढं करून भाई थांबले नाहीत.मुंबई-सिंधुदुर्ग असा रायगड,रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांना जोडणारा ग्रीन फिल्ड कोकण द्रुतगती चा महामार्ग तयार होत असून,त्यामुळे कोंकण विभागातील औद्योगिक व पर्यटन विकासासह दळणवळणाची सोयही गतिमान होताहे. या व्यतिरिक्त ठाण्याहून घोडबंदरमार्गे बोरिवलीला जाणारा रस्ता ; शीळ- कल्याण रुंदीकरण ; ठाणे घोडबंदर उन्नत रस्ता ; वडाळा-घाटकोपर ठाणे मेट्रो ; ठाणे शहरअंतर्गत मेट्रो प्रकल्प ; कल्याण-ठाणे-मुंबई जलवाहतूक ;ठाण्यातील कोपरी पुल ;वांद्रे-वर्सावा सी लिंक प्रकल्प ; मुंबई पश्चिम किनारपट्टीवरील कोस्टल महामार्ग प्रकल्प आदी तत्सम पब्लिक प्रोजेक्ट प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे राज्यभरातील दळणवळण प्रक्रिया गतिमान होईल,ही काळ्या दगडावरील पांढरी रेष आहे.वास्तवात नागरी जीवन अधिक सुखकर,विना अडथळयाचं,कमी खर्चाचं,वेळ वाचविणारं आणि समृद्ध करण्याकडे शिंदेसाहेबांचा मानस असल्याचे निष्पन्न होते.

समृद्धी महामार्ग हा ड्रीम प्रोजेक्ट सार्वजनिक बांधकाम मंत्री या नात्याने शिंदेसाहेबांनी या प्रकल्पाची उभारणी जलदगतीने व्हावी,या उद्देशाने अधिक लक्ष घातले आहे.यावर सुमारे ५५ हजार कोटी रुपये अंदाजित खर्च अपेक्षित आहे.त्यामुळे १० जिल्हे,२६,तालुके अन् ३९३ खेडींची दळणवळणाची मोठी सोय झाली आहे.हा प्रोजेक्ट राज्यातील लोकांना वरदान ठरला आहे.त्यामुळे अवघ्या ८ तासात



मुंबई-नागपूर अंतर पार करता येत आहे.त्यास वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात आले आहे.वास्तवात हीच खरी ना.एकनाथ शिंदेसाहेबांच्या कारकिर्दीतील विकासगाथा होय.

शिंदे सरकारचा सर्वात महत्वाकांक्षी निर्णय म्हणजे स्त्रियांना वयाची अट न ठेवता,एस टी बसने अर्ध्या तिकीटावर प्रवास सवलत आणि ७५ वर्षांवरील वृद्धांना एस.टी.प्रवास मोफत करण्याची मुभा दिल्याने त्यांना तीर्थयात्रा करणं सुकर झालं आहे.त्याची परिणिती म्हणजे स्त्रिया अन् वृद्धमंडळीची एस.टी.ने प्रवास करणाऱ्यांची संख्या अनेक पटीने वाढली आहे.यास्तव विविध संघटना/सेवाभावी संस्थांनी शिंदेसाहेबांचे शतशः आभार मानले आहेत.

ठाणे शहरातील धोकादायक अन् मोडकळीस आलेल्या इमारतींतल्या लोकांचे जीवन सुरक्षित करून त्यांना त्यांच्या हक्काचे घर देण्यासाठी नगर विकास मंत्री या नात्याने त्यांच्या प्रयत्नांतून क्लस्टर डेव्हलपमेंट योजना कार्यान्वित करण्यात आली. त्यासाठी सिडको व ठाणे महापालिका यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्या.गेली दोन दशके क्लस्टर योजनेसाठी जो लढा दिला,त्याची ही फलश्रुती आहे,असे विधान शिंदेसाहेबांनी याप्रसंगी केले.या महत्वाकांक्षी योजनेमुळे सुमारे ८ ते १० लाख ठाणेकरांना त्यांच्या हक्काचा निवारा मिळून,त्याचे नवे व सुंदर घर मिळण्याचे स्वप्न साकार होईल,हे निश्चित."आमदार झाल्यानंतर २००४ साला पासून मी सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी अविश्रांत प्रयत्न करत आहे" अशी स्पष्टोक्ती शिंदेसाहेबांनी यावेळी बोलताना केली.

शिंदे पिता-पुत्राने लोकोपयोगी कामांच्या व संघटन कौशल्याच्या जोरावर अनुक्रमे विधानसभा व लोकसभेच्या निवडणुकीत मोठा विजय संपादन केला.ना.शिंदेसाहेबांनी कोपरी-पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातून सलग ५ वेळा तर,डॉ.श्रीकांत शिंदे यांनी कल्याण लोकसभा मतदारसंघातून सलग ३ वेळा मोठ्या मताधिक्याने विजय मिळवून आपली राजकीय योग्यता सिद्ध केली.



गेल्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात ना.एकनाथजी शिंदे यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून ५१,०००हून अधिक गोरगरीब,निर्धन,गरजू लोकांच्या महागड्या शस्त्रक्रियेंसाठी ३१७ कोटीहून अधिक अर्थसहाय्य अदा केलं,ही अद्वितीय व अतुलनीय गोष्ट असून,आरोग्य क्षेत्रात एक विक्रम प्रस्थापित केला आहे,असे अभिमानाने म्हणावे लागेल. याशिवाय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या उपक्रमाअंतर्गत राज्यात ७०० दवाखाने सुरू करण्याचा शिंदेसाहेबांचा मानस आहे.ठाणे-मुंबई जिल्ह्यात आज शेकडो आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत.त्याचा आजमितीपर्यंत लाखों लोकांनी लाभ घेतला आहे.महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत असंख्य गोरगरीब लोकांना महागडे ऑपरेशन करण्यास अर्थसहाय्य प्राप्त झालं आहे.आता पांढऱ्या रेशन कार्डधारकांना देखील या योजनेचा लाभ मिळत आहे.त्यामुळे गरजू रुग्णांमध्ये जगण्याची एक नवी उमेद निर्माण झाली आहे.

गेल्या काही वर्षांत राज्यातील गोरगरीब,निर्धन लोकांच्या सुमारे ५,६०० हून अधिक महान मुला-मुलींच्या हृदयावरील छिद्राचे ठाण्याचे सुप्रसिद्ध ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करून दिल्या आहेत.त्यामुळे ती मुलं आता निरोगी जीवनाचा श्वास घेत सुदृढ जीवन जगत आहेत.याशिवाय कोरोना काळात रुग्णांची ने-आण करणं सुकर व्हावं,या उद्देशाने डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्यावतीने राज्यात सुमारे ३०० रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले.खऱ्या अर्थाने ही आरोग्य क्षेत्रातली क्रांतीच म्हणावी.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन,आरोग्यदूत फाउंडेशन तथा रत्न निधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या षष्ठ्यब्धि निमित्त राज्यात एकनाथ हिरक आरोग्य वर्ष साजरा केलं जात आहे.अतः या वर्षादरम्यान ६०० लहान मुलांच्या हृदयावर मोफत शस्त्रक्रिया;६०० दिव्यांग बांधवांना मोफत साहित्य वाटप;६० महाआरोग्य शिबिराचे आयोजन;६० हजार नागरिकांचे मोफत आरोग्य



तपासणी; ६० हजार नागरिकांना मोफत चष्मे वाटप; ६० हजार नागरिकांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया; ६० हजार किलोमीटरची आरोग्य संपदा यात्रा; ६० हजार वृक्षांची लागवड आणि ६० हजार रक्तपिशवींचे संकलन संकल्प हे उपक्रम राबविले जात आहेत.

ना.एकनाथजी शिंदे यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीत ऐन विधानसभा निवडणुकींच्या आधी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण ही महत्त्वाकांक्षी योजना राबवून आपली राजकीय परिपक्वता सिद्ध केली. गत लोकसभेच्या निवडणुकीत महायुतीला मोठा फटका बसला होता. त्याचा वचपा काढत शिंदेसाहेबांच्या नेतृत्वाखाली महायुतीने विधानसभा निवडणुकींमध्ये प्रचंड विजय संपादन करून महाविकास आघाडीचा दारुण पराभव केला.या अभूतपूर्व विजयश्रीचे श्रेय सर्वस्वी शिंदेसाहेबांना जाते.या योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्वधर्मीय महिलांना माहे १५०० रुपये अर्थसहाय्य देऊन त्यांना स्वावलंबी जीवन जगण्याचा मार्ग दाखविला. सदर अर्थसहाय्याच्या मदतीने राज्यातल्या माता-भगिनी छोटाखानी उद्योग करून स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या.राज्यातील सुमारे १ कोटी ६० लाख गोरगरीब,गरजू महिलांना या योजनेचा लाभ मिळाला. यास्तव भगिनींनी शिंदेसाहेबांना भाऊरायाची उपमा देऊन त्यांचे मनःपूर्वक आभार मानत,त्यांना बहिणीच्या नात्याने भरभरून राख्या बांधल्या.यालाच खऱ्या अर्थानं राजकारणातून समाजकारण करणं म्हणतात.

राज्यातील गोरगरीब,गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे घरकुल,शिक्षण,रोजगार- स्वयंरोजगार,आरोग्य हे मूलभूत प्रश्न शिंदेसाहेबांनी मार्गी लावले आहेत,ही कौतुकास्पद गोष्ट आहे.त्याचप्रमाणे बळीराजाच्या कृषी वीजपंपाचे बिलं माफ करण्यात आली आहेत. अतिवृष्टी अन् गारपिटीमुळे शेतपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना वेळोवेळी अर्थसहाय्य देण्यात आले आहे.त्यामुळे राज्यातील शेतकरी सुखावला आहे. शिंदेसाहेबांच्या प्रयत्नातून वारकरी मंडळांना प्रत्येकी 20 हजार रुपये अर्थसहाय्य देण्यात सुरुवात झाली आहे.ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत तीर्थ यात्रा करण्यास जाण्यासंदर्भात तरतूद करण्यात आली आहे. याबद्दल वारकरी संस्थांकडून शिंदेसाहेबांचे मनस्वी आभार ! उपमुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे यांना समस्त वारकरी संस्थांतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!आपणास आरोग्यदायी असं दीर्घायुष्य लाभो,ही आई जगदंबे चरणी प्रार्थना!

# आरोग्य सेवेच्या बळकटीकरणासाठी मोबाईल व्हॅन

## रुग्णवाहिकांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता मुंबई : राज्यात कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून कर्करोग निदान व उपचारासाठी व राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, दर्जेदार आणि नागरिकांना सहजपणे उपलब्ध करून देण्यासाठी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात विविध आरोग्य सुविधांचे लोकार्पण होणार आहे.

नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे दुपारी १ वाजता या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ८ कर्करोग मोबाईल व्हॅन, ७ ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट रुग्णवाहिका, १०२ क्रमांकांच्या ३८४ रुग्णवाहिका, २ सीटी स्कॅन मशीन, ८० डिजिटल हँड हेड एक्स-रे मशीनचे लोकार्पण करण्यात येणार आहे. तसेच राज्यात ६ डे केअर किमोथेरपी सेंटर सुरू करण्याची घोषणाही यावेळी करण्यात येणार आहे.

आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने राज्यातील आठ मंडळांमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून स्थानिक लोकप्रतिनिधीही सहभागी होणार आहेत. या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपण होणार आहे. या सुविधांमुळे राज्यातील ग्रामीण, आदिवासी आणि दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्य विभागाच्या आरोग्य सेवांचा लाभ घेता येणार आहे.

राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या लोकार्पण सोहळ्याला प्रतापराव गणपतराव जाधव, केंद्रीय राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) आयुष मंत्रालय व राज्य मंत्री, स्वास्थ्य एवं परिवार कल्याण, भारत सरकार यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. यांच्यासह या कार्यक्रमाला राज्याचे वन मंत्री गणेश रामचंद्र नाईक, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या राज्य मंत्री मेघना साकोरे बोर्डीकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी खासदार श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, खासदार बाळयामामा म्हात्रे विशेष निमंत्रित असून स्थानिक लोकप्रतिनिधी कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाला आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार रविंद्र चव्हाण, दौलत दरोडा, आमदार संजय केळकर, आमदार कुमार आयलानी, आमदार महेश चौगुले, आमदार विश्वनाथ भोईर, आमदार राजेश मोरे, आमदार निरंजन डावखरे, आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड, आमदार किसन कथोरे, आमदार मंदा म्हात्रे, आमदार डॉ. बालाजी किणीकर, आमदार शांताराम मोरे, आमदार नरेंद्र मेहता, आमदार रईस शेख, आमदार सुलभा गायकवाड उपस्थित राहणार आहेत.

आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव विरेन्द्र सिंह, आरोग्य सेवा तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक अमगोथू श्री रंगा नायक, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाचे संचालक डॉ. स्वप्नील लाळे यावेळी उपस्थित राहणार आहेत.

# पोलीस ठाण्याच्या आवारातच महिला तक्रार निवारण केंद्र सुरु करण्याची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे – बदलापूर येथील एका खासगी शाळेत झालेल्या विद्यार्थिनीचा विनयभंग प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या निलीमा चौधरी यांनी शुक्रवारी संबंधीत शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी पोलिसांशी संवाद साधून या प्रकरणातील सर्व दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना केल्या. तर अंबरनाथ, उल्हासनगर आणि बदलापूर येथे महिला तक्रार निवारण केंद्रच नसल्याचे समोर आले असता पोलिसांनी आता पुढाकार घेऊन पोलीस ठाण्याच्या आवारातच जलदगतीने महिला तक्रार निवारण केंद्र सुरु करण्यात यावे. यासाठी तीनही शहरातील पोलिसांनी प्रस्ताव सादर करावे अशा सूचना त्यांनी यावेळी स्थानिक पोलीस प्रशासनाला दिल्या आहेत.

काही महिन्यांपूर्वी बदलापूर येथील एका शाळेत दोन अल्पवयीन मुलींचे शाळेतील सफाई कर्मचाऱ्यांकडून लैंगिक शोषण झाल्याचे समोर आले होते. यानंतर ही बदलापूर, अंबरनाथ तसेच उल्हासनगर या शहरांमध्ये महिला तक्रार निवारण केंद्रच नसल्याची बाब उघडकीस आली होती. मात्र त्यानंतरही ही केंद्र सुरु करण्यासाठी कोणतीही पाऊले उचलण्यात आली नाही. असे असतानाचा पुन्हा एका अल्पवयीन मुलीचा शाळेतच विनयभंग झाल्याची घटना समोर आली. याच पार्श्वभूमीवर किमान पोलीस प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन बदलापूर, अंबरनाथ आणि उल्हासनगर येथील पोलीस ठाण्याच्या आवारातच जलदगतीने महिला तक्रार निवारण केंद्र सुरु करण्यात यावे. यासाठी तीनही शहरातील पोलिसांनी प्रस्ताव सादर करावे अशा सूचना राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या निलीमा चौधरी यांनी यावेळी स्थानिक पोलीस प्रशासनाला दिल्या आहेत.

# राज्यात मक्याचे क्षेत्र दुप्पटीने वाढले

मुंबई : केंद्र सरकारने मक्यापासून इथेनॉल निर्मितीला चालना दिली आहे. पशूखाद्य, कोंबडी खाद्य आणि चाऱ्यासाठी मक्याला मागणी वाढली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून यंदाच्या रब्बी हंगामात मक्याची लागवड दुप्पटीने वाढून ४.८४ लाख हेक्टरवर गेली आहे.

राज्यातील रब्बी हंगामातील पेरण्या उरकल्या आहेत. सरासरीच्या तुलनेत १० लाख ५९ हजार ९३१ हेक्टरने लागवड वाढली आहे. प्रामुख्याने मक्याच्या लागवडीत दुप्पटीने वाढ झाली आहे. मक्याचे सरासरी क्षेत्र २ लाख ५८ हजार ३२१ हेक्टर होते. गतवर्षी ३ लाख ३७ हजार ९३५ हेक्टरवर पेरणी झाली होती, यंदा ४ लाख ८४ हजार ११ हेक्टरवर लागवड झाली आहे.

केंद्र सरकारने मक्यापासून इथेनॉल निर्मितीला चालना दिली आहे. पशूखाद्य आणि कोंबडी खाद्य म्हणून मक्याला मागणी आहेच. पशूधनाला चारा म्हणून मक्याचा वापर मोठ्या



प्रमाणावर केला जातो. त्यामुळे गत वर्षात मक्याचे दर ३० रुपये किलोंवर गेले होते. त्यामुळे रब्बी हंगामात देशभरात मक्याच्या लागवडीत मोठी वाढ झाली आहे. राज्यातही तशीच स्थिती आहे. सरासरीच्या तुलनेत दुप्पटीने मक्याची लागवड वाढली आहे.

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात रब्बी हंगामातील सरासरी क्षेत्र ५३ लाख ९६ हजार ९६९ हेक्टर आहे. गतवर्षीचे पेरणी क्षेत्र ५७ लाख ८० हजार ९९९ हेक्टर होते. यंदा ६४ लाख ५६ हजार ९०० हेक्टरवर पेरणी झाली आहे. रब्बीच्या पेरण्यांमध्ये सरासरीच्या तुलनेत १० लाख ५९ हजार ९३१ हेक्टरने वाढ झाली आहे.

# 'डिजीटल अरेस्ट'ची भीती दाखवून सेवानिवृत्त महिलेला ५१ लाखांचा गंडा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता डोंबिवली : मुंबई महापालिकेतून सेवानिवृत्त झालेल्या डोंबिवलीतील महाराष्ट्रनगर भागात राहत असलेल्या एका ५९ वर्षाच्या सेवानिवृत्त महिला अधिकाऱ्याला डिजीटल अँरेस्टची भीती दाखवून तोतया पोलिसाने या महिलेकडून गेल्या महिन्यात ५१ लाख ३५ हजारू रूपये उकळले आहेत. आपली फसवणूक झाल्याचे आणि सेवानिवृत्तीची सर्व रक्कम तोतया पोलीस असलेल्या भामट्यांनी लाटल्याचे लक्षात आल्यावर सेवानिवृत्त महिलेने विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे.

दैनिक जीवनदीप वार्ता

# सिडकोची घरं पुनर्खरेदीची संधी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /नवी मुंबई :

नवी मुंबई परिसरामध्ये ज्यांचे स्वमालकीचे घर आहे, अशा व्यक्तींना आतापर्यंत सिडको महामंडळाच्या घर सोडतीमध्ये सहभाग घेता येत नव्हता, मात्र सिडको मंडळामध्ये काही उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या सूचनांनंतर ही अट शिथिल करण्यासाठी नवा प्रस्ताव बनविण्याचे काम सिडको मंडळाच्या पणन विभागात सुरू आहे. हा प्रस्ताव अद्याप प्राथमिक स्तरावर आहे. सिडकोच्या सोडतीमधील विक्रीविना शिल्लक घरांच्या विक्रीसाठी यामधून मोठा ग्राहक वर्ग मिळविण्यासाठी हा प्रस्ताव बनविण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याची माहिती सिडकोच्या विश्वसनीय सूत्रांनी दिली. सिडकोने अनेक सोडतींमध्ये यापूर्वीच घरे विक्रीसाठी उपलब्ध केली आहेत, ती या योजनेतून खरेदी करण्याची संधी नवी मुंबई क्षेत्रात स्वताचे घर असणाऱ्या व्यक्तींना मिळणार आहे. सिडको महामंडळाने नवी मुंबईत ६७ हजार घरांचे बांधकाम पाच वर्षांपूर्वी हाती घेतले. मात्र ही ६७ हजार घरे बांधण्यापूर्वीच सिडकोच्या दफ्तरी सिडकोने बांधलेल्या विविध गृहप्रकल्पामधील हजारो घरे विक्रीविना शिल्लक आहेत. नुकत्याच काढलेल्या २६ हजार घरांच्या सोडतीला सिडकोच्या अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद मिळाला नसल्याने घरांमध्ये आणखी भर पडली आहे. केंद्र व राज्य सरकारची मर्जी राखण्यासाठी सिडको मंडळाला ६७ हजार घरांच्या बांधकामाचे उदिष्ट देण्यात आले. यासाठी सुमारे १५ हजार कोटी रुपये या गृह प्रकल्पाच्या बांधकामावर सिडको खर्च करत आहे. ही रक्कम सिडकोला कमी पडत असल्याने आतापर्यंत सिडकोने एसबीआय बँकेकडून ११२५ कोटी रुपये कर्ज घेतले आहे. त्याशिवाय नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित प्रभाव क्षेत्र (नैना) प्रकल्प, खारघर तुर्भे लिंकरोड, मेट्रो मार्गिकेचे विस्तारित प्रकल्प, आंतरराष्ट्रीय विमानतळाला शहरांशी जोडणारे उलवा कोस्टल यांसारखी दळणवळणातील विविध रस्ते आणि उड्डाणपूल बांधण्याचे काम सिडको करीत आहे.

## मार्मिकचे माजी कार्यकारी संपादक पंढरीनाथ सावंत यांचे निधन



प्रबोधनकार ठाकरे आणि हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ पत्रकार, मार्मिकचे माजी कार्यकारी संपादक पंढरीनाथ सावंत यांचे आज पहाटे निधन झाले. राज्य शासनाने लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार तसेच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाने कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित केले होते. काही महिन्यांपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी त्यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदतीचा हात दिला होता. त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभों अशी सदिच्छाही व्यक्त केली होती. परंतु, आजाराविरूध्दचा त्यांचा लढा अखेर थांबला. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या परिवारजनांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो. शिवसेना त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.

# आदिवासी आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : दि.1 फेब्रुवारी 2025 रोजी मुरबाड तालुक्यातील सह्याद्रीच्या पायथ्याशी असणार्या वाल्हिवरे अनुदानित आश्रम शाळेतील एका 16 वर्षाच्या इयत्ता दहावी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांने शाळेच्या बाहेर जाऊन शेजारील जंगलात आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली असून मुरबाड, शहापूर तालुक्यातील सर्वच आदिवासी आश्रम शाळेतील शिकणारे विद्यार्थी , विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आदिवासी समाजातील मुलं- मुली शिक्षणाच्या मुळ प्रवाहात येण्यासाठी शासन स्तरावर विविध योजना राबविण्यात येत असून त्यासाठी महाराष्ट्र सरकार आदिवासी विकासाच्या नावाने करोडो रुपये खर्च करित आहे. आदिवासी मुले शिक्षणापासून वंचित राहू नये त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा हा त्यामागिल उद्देश आहे.त्यासाठी ठाणे , पालघर सारख्या आदिवासी बहुल भागात




शासकीय निवासी व काही खाजगी अनुदानित आश्रम शाळांना मंजुरी देऊन आदिवासी समाजाचे जिवनमान उंचावण्याचे प्रयत्न सुरु आहेत, परंतु आजची परिस्थिती बघितल्यास यावर नियंत्रण ठेवणारी शासकीय यंत्रणा कुचकामी ठरत असून फक्त कागदी घोडे नाचविण्यात धन्यता मानुन लाखोंचा मलिदा आदिवासी प्रकल्प अधिकारी, कर्मचारी लाटत आहेत. आजही निवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या आहारात सडका भाजिपाला, दुध ,अंडी यांचा पत्ताच नसतो , दुषित पिण्याचे पाणी ,मुलांचे आरोग्य यावर जाणुन बुजुन दुर्लक्ष केले जात आहे. यामध्ये खाजगी संस्था चालक, अधिक्षक, मुख्याध्यापक सुद्धा सामिल असतात. ही सर्व वरपर्यंत मिली भगत असून यामध्ये आदिवासी विद्यार्थी मात्र भरडला जात आहे.सर्वात धक्कादायक बाब म्हणजे अनेक आश्रम शाळांमध्ये विद्यार्थीनींना शाळेतीलच कर्मचारी वर्गाकडून शारिरीक व मानसिक त्रास तसेच लैंगिक शोषण केल्याच्या घटना मुरबाड, शहापूर मध्ये घडल्या आहेत. अनेक मुली भिती पोटी अशा घटना सांगत नसून मुकाट्याने सहन करतात .यामध्ये आश्रम शाळेतीलच कोणितरी सामिल असल्याने अशा घटना दाबल्या जातात. अनेक वेळा समाज माध्यमातून , वृत्तपत्रांतुन आवाज उठविला जातो परंतु थातूर मातूर कारवाईचे सोंग केल्याचा देखावा वरिष्ठ अधिकारी दाखवतात पुन्हा परिस्थिती जैसे थे राहते. वालिव्हरे येथील मुलाच्या आत्महत्येचे कारण तपासाअंती समोर येईलच तत्पुर्वी येथील संस्था चालकांनी दोन अधिक्षक, एक मुख्याध्यापक , एक वर्ग शिक्षक यांच्यावर निलंबनाची कारवाई केली असली तरी हे प्रकरण इथेच थांबणारे नसून मुरबाड, शहापूर तालुक्यातील सर्वच आदिवासी आश्रम शाळांची सरकारने उच्च स्तरीय चौकशी लावावी व यात दोषी आढळणाऱ्या वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी यांना घरचा रस्ता दाखवावा अशी मागणी आदिवासी समाजासह सर्वत्र जोर धरू लागली आहे.

# कंत्राटी कामगारांचे वेतन लाटणाऱ्या कंत्राटदारांना अपात्र करा

## कायद्याने वागा लोकचळवळीची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगर महापालिकेच्या लेखा विभागाने सादर केलेल्या अहवालातील चौकशीत दोषी ठरूनही ज्या मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांनी कामगारांच्या फरकाची रक्कम विहित कालावधीत अदा केली नाही, तर, त्यांना यापुढील कोणत्याही नव्या निविदा प्रक्रियेत अपात्र ठरवण्याची मागणी कायद्याने वागा लोकचळवळीने केलीय.

महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांनी हि मागणी तत्वतः मान्य केली असून सदर फरकाची वसूली आणि संबंधित कंत्राटदारांविरोधात कायदेशीर कारवाईसाठी आयुक्त महोदयांना लवकरच प्रस्ताव सादर केला जाईल, असं आश्वासन त्यांनी शिष्टमंडळाला दिलं. मे, २०२३ मध्ये कायद्याने वागा लोकचळवळीने लेबर राईट्स या आपल्या कामगार आघाडीच्या वतीने



कंत्राटी कामगारांच्या मागण्यांबाबत बेमुदत उपोषणाचं आंदोलन केलं होतं. तत्कालीन आयुक्त अजीज शेख यांनी लेखा परीक्षक शरद देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली होती. १४ ऑगस्ट २०२३ रोजी देशमुख यांनी सादर केलेल्या अहवालात ६ कंत्राटदारांविरोधात १ कोटी ३५ लाखांची वसुली दाखवण्यात आली होती. ती वसूल झालेली नाही, कामगारांना ती फरकाची रक्कम मिळालेली नाही, उलट संबंधित दोषी कंत्राटदारांना अपात्र न ठरवलं गेल्यामुळे तेच कंत्राटदार कार्यरत असून फरकाच्या रक्कमेत वाढ झालेली आहे.

शिवाय, चौकशी समितीने अधोरेखित केलेली फरकाची रक्कम केवळ एका वर्षाची आहे, मात्र कंत्राटाच्या संपूर्ण कालावधीची फरकाची रक्कम कामगारांना मिळाली पाहिजे, अशी आमची मागणी असल्याचं कायद्याने वागा लोकचळवळीचे प्रणेते राज असरोंडकर यांनी सांगितलं. जोपर्यंत ही फरकाची संपूर्ण कालावधीची रक्कम संबंधित कंत्राटदार कामगारांना अदा करत नाहीत, तोपर्यंत त्यांना नव्या कोणत्याही निविदेत सहभागी होण्यापासून अपात्र ठरवावे, अशीही आमची मागणी असल्याचं असरोंडकर यांनी म्हटलं आहे.

कायद्याने वागा लोकचळवळीने आयुक्तांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने एका बैठकीचं आयोजन अतिरिक्त आयुक्त जमीर लेगरेकर यांनी केलं होतं. त्या बैठकीत सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त डॉ. विजय खेडकर आणि सहायक आयुक्त सुनील लोंढे उपस्थित होते. राज असरोंडकर यांच्या सोबत कायद्याने वागा लोकचळवळीचे उल्हासनगर शहर अध्यक्ष प्रदीप कपूर, कामगारांच्या वतीने लेबर राईट्स चे उल्हासनगर मनपा समन्वयक प्रकाश भोसले आणि समन्वय समिती सदस्य राहुल परब, राहुल पाटील, गणेश क्षीरसागर, संतोष भोईर, प्रवीण फूंदे, चंद्रकांत गायकवाड, नितीन साळवे, स्वप्नील गायकर, सचिन जावळे, मयुर पवार, मनोज जाधव उपस्थित होते.

कामगारांचा पगार दरमहा ७ तारखेच्या आत झाला पाहिजे व तसे न झाल्यास कंत्राटदाराला प्रति दिन प्रति कामगार १०० रुपये दंड आकारावा, कामगारांना नेमणूकपत्र तसंच वेतनपावती दिली गेलीच पाहिजे, वर्तमान विशेष भत्त्यानुसार किमान वेतन, पीएफ, आरोग्य विमा दिलं गेलंच पाहिजे, २२ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसारच कंत्राटदारांची देयके प्रमाणित व्हावीत व तसं न करणाऱ्या विभागप्रमुखांविरोधात शिस्तभंगाची कारवाई व्हावी, अशा अनेक मागण्या कायद्याने वागा लोकचळवळीने बैठकीत केल्या. त्याला प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला, अशी माहिती लेबर राईट्स चे उल्हासनगर मनपा समन्वयक प्रकाश भोसले यांनी दिली. कुशल वर्गवारीत आणणं, लिडिंग फायरमनना ज्यादा वेतन देणं, कोविड संकटकाळात काम केलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांना सामावून घेणं आणि कंत्राटी कामगारांच्या नेमणुकीत उल्हासनगर मनपा क्षेत्रातील नागरिकांना प्राधान्य देणं अशा इतर विषयांवरील चर्चेतही प्रशासनाचा प्रतिसाद पूरक होता, असं प्रकाश भोसले यांनी सांगितलं.

आयुक्त मनीषा आव्हाळे यासुद्धा कंत्राटी कामगारांच्या मुद्यावर सकारात्मक असतील व त्या कामगारांना न्याय मिळवून देतील, असा विश्वास प्रकाश भोसले यांनी व्यक्त केला आहे.

## महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची अंतिम फेरी रत्नागिरीत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित २१ वी महाराष्ट्र राज्य बाल नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी येथील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर नाट्यगृहात दि. १२ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत रंगणार आहे प्राथमिक फेरीतून पात्र ठरलेले राज्यातील एकूण ३२ संघ या अंतिम फेरीत बालनाट्याचे सादरीकरण करणार आहेत. रत्नागिरीमध्ये आत्तापर्यंत गद्य नाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी आणि संगीत नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी झाली होती. मात्र बालनाट्य स्पर्धेची अंतिम फेरी पहिल्यांदाच रत्नागिरीत होत आहे. बालनाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीनिमित्ताने ५०० पेक्षाहून अधिक बालकलाकार सादरीकरणासाठी रत्नागिरीत येणार आहे. स्पर्धेसाठी मुंबई, पुणे, ठाणे, संभाजीनगर, अहिल्यानगर, जळगाव, परभणी, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर, कल्याण, यवतमाळ, अकोला, नंदुरबार, भुसावळ, नाशिक, सांगली, नांदेड, अमरावती तसेच इंदौर येथून संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेचा उद्धाटन समारंभ दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृहात होणार आहे. दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ६ या वेळेत बालनाट्यांचे सादरीकरण होणार आहे.

## विद्यार्थ्यांसाठी शिक्षण मंडळाकडून समुपदेशन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई :येत्या काही दिवसातच दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा सुरू होणार असून, शिक्षण मंडळाने ऑनलाइन समुपदेशनाची सुविधा सुरू केली आहे.या समुपदेशाने विद्यार्थाना आलेलं टेन्शन, नैराश इत्यादी गोष्टीतून बाहेर काढले जाणार आहे. ज्यामुळे विद्यार्थाना व्यवस्थित परीक्षा देता येणार आहे. तर चला या बातमीबद्दल अधिक माहिती जाणून घेऊयात. विद्यार्थ्यांच्या परीक्षा - राज्य मंडळाने 11 फेब्रुवारी ते 18 मार्च 2025 या कालावधीत इयत्ता बारावी आणि 21 फेब्रुवारी ते 17 मार्च 2025 या कालावधीत इयत्ता दहावीच्या परीक्षांसाठी समुपदेशकांची नियुक्ती केली आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेतल्या जातील.

भ्रमणध्वनीद्वारे निशुल्क समुपदेशन - समुपदेशक विद्यार्थ्यांना व पालकांना परीक्षा संबंधित मानसिक दडपणावर मात करण्यासाठी मार्गदर्शन करतील. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या आधी आणि परीक्षेच्या कालावधीत सकाळी 8 ते रात्री 8 या वेळेत भ्रमणध्वनीद्वारे निशुल्क समुपदेशन दिले जाईल. या सेवेचा वापर विद्यार्थ्यांनी आपल्या मानसिकतेवर ताण कमी करण्यासाठी आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी करावा, असे राज्य मंडळाचे सचिव डॉ. माधुरी सावरकर यांच्याकडून सांगण्यात आले आहे. कोणते प्रश्न विचारू नयेत ? विद्यार्थी आणि पालकांनी समुपदेशकांना परीक्षा केंद्र, बैठक व्यवस्था किंवा प्रश्नपत्रिका यासंबंधी प्रश्न विचारू नयेत, असेही त्यांनी सांगितले आहे. शासनाचा हा निर्णय विद्यार्थी आणि पालकांसाठी फायदेशीर ठरणार आहे. या समुपदेशन सेवा विद्यार्थ्यांना मानसिक ताण आणि परीक्षेच्या भीतीवर नियंत्रण ठेवण्यास मदत करतील. विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी या उपक्रमाची आवश्यकता अत्यंत महत्वाची आहे, असे देखील सांगण्यात आले आहे. भ्रमणध्वनी क्रमांक - 1) 9011302997 2) 8263876896 3) 8767753069 4) 7387400970 5)9960644411 6) 7208775115 7) 8169202214 8) 9834084593 9) 8329230022 10) 9552982115

# कल्याण डोंबिवलीतील अमली पदार्थांसह १९ जणांना अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली: कल्याण, डोंबिवली शहरात मागील तीन महिन्यापासून पोलिसांचे नशा मुक्त अभियान सुरू आहे. या विशेष अभियानातून अंमली पदार्थ विरोधी पथकाने गेल्या चाळीस दिवसांच्या कालावधीत कल्याण, डोंबिवली शहराच्या विविध भागातून एकूण १२ लाखाहून अधिक किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले आहेत. याप्रकरणात पोलिसांनी १९ जणांना अटक केली आहे.

जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थांमध्ये ६३ ग्रॅम मेफोड्रिन, नशा आणणाऱ्या २३२ कोडिनयुक्त बाटल्या, ४८ किलो गांजाचा समावेश आहे. याप्रकरणात मानपाडा पोलीस ठाणे हद्दीत डोंबिवलीत नांदिवली टेकडी भागातून सनिल श्रीसमर्थ यादव (२५) यांच्याकडून ८.४८ ग्रॅम वजनाचा १६ हजार रूपये किमतीचा गांजा जप्त



करण्यात आला आहे. अंमली पदार्थ तस्करी विरोधी कायद्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डोंबिवली पूर्वेतील राजाजी पथ येथील स्वामी नारायण मंदिराच्या बाजुला असलेल्या मोकळ्या जागेतून रामनगर पोलीस ठाणे हद्दीत पोलिसांनी सचिन एकनाथ कावळे (३२, रा. वसंत केणे चाळ, दत्तनगर, डोंबिवली), दत्तनगर मधील एक १६ वर्षाचा अल्पवयीन मुलगा यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून २६ ग्रॅम मेफोड्रिन पावडर, १० ग्रॅम चरस जप्त करण्यात आली. या पदार्थांची बाजारातील किंमत ९३ हजार रूपये आहे. त्यांच्यावर रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याणमधील बाजारपेठ पोलीस ठाणे हद्दीत दुर्गाडी किल्ला भागातील भटाळे तलाव भागातून अंमली पदार्थ विरोध पथकाने शंकर महादेव गिरी (४६) यांना ताब्यात घेतले आहे. ते मुळचे बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील टाकळी गावचे रहिवासी आहेत. ते मजुरीसाठी कल्याणमध्ये आले होते. त्यांच्या ताब्यातून एक लाख रूपये किमतीचा नऊ किलो गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. बाजारपेठ पोलीस ठाण्यात त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणे ते कर्जत दरम्यान गांजा तत्सम अंमली पदार्थांची तस्करी करणारा एक मोठा भाई डोंबिवलीत राहतो. तो किरकोळ विक्रीतून अंमली पदार्थ विकत असतो अशी चर्चा आहे. त्यामुळे डोंबिवली, कल्याण परिसरात मागील अनेक वर्ष गांजाची तस्करी वाढली. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी पदभार स्वीकारल्यापासून ही तस्करी, त्यांचे अड्डे उद्धवस्त करण्याची मोहीम सुरू केली आहे.

अंमली पदार्थ तस्करी प्रकरणी विविध पोलीस ठाण्यात एकूण १३ गुन्हे दाखल आहेत. याप्रकरणात १९ जणांना अटक करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थांची किंमत १२ लाखाहून अधिक आहे. नशामुक्त शहरे हे शीर्षक घेऊन अंमली पदार्थ तस्कर, अड्डयांवर कारवाई तत्परतेने कारवाई केली जात आहे. अशाप्रकरणात नागरिकांनी माहिती दिली तरी त्यांचे नाव गुप्त ठेऊन संबंधित अड्डयांवर कारवाई केली जात आहे.
- अतुल झेंडे, पोलीस उपायुक्त, कल्याण परिमंडल

# कल्याण रेल्वे स्टेशन तिकीट काउंटरवर प्रवाशांची लूट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सोशल मीडियावर सध्या कल्याण रेल्वेस्थानकातील एक धक्कादायक व्हिडीओ व्हायरल होत आहे. जिथे तिकीट काउंटरवरील कर्मचाऱ्याकडून प्रवाशांची मोठी लूट सुरू आहे. एका तिकीटमागे प्रवाशांकडून जवळपास ३० रुपये एक्स्ट्रा चार्ज घेतला जातोय, इतकं करूनही तिकीट खिडकीवरील कर्मचारी ती गोष्ट मान्य करण्यासही तयार नाही, यावरून एक प्रवासी त्याला जाब विचारताना दिसतोय. सध्या या घटनेचा व्हिडीओ पाहून सोशल मीडियावर लोकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. नक्की संपूर्ण प्रकरण काय आहे ते जाणून घेऊ...

तिकीट काउंटरवरील कर्मचाऱ्यांना फक्त तिकीटवरील नमूद रक्कम घेण्याचा अधिकार असतो. ते प्रवाशांकडून कोणत्याही जादा रकमेची मागणी करू शकत नाहीत किंवा घेऊ शकत नाहीत. मात्र, कल्याण रेल्वे स्टेशनवरील एका तिकीट काउंटरवर प्रवाशांची मोठी लूट सुरू आहे. इथे एका तिकीट काउंटरवरील कर्मचारी प्रत्येक प्रवाशाकडून एका तिकिटामागे ३० रुपये एक्स्ट्रा चार्ज घेताना दिसतोय. धक्कादायक बाब म्हणजे एका प्रवाशाने याबाबत विचारणा केली असता, तो त्याच्याशी अरेरावीची भाषा करीत होता.

व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, एक प्रवासी तिकीट काउंटरवर नेत्रावली एक्स्प्रेस या ट्रेनचे तिकीट काढण्यासाठी तिकीट काउंटरवर उभा होता. यावेळी त्याच्या लक्षात आले की, तिकीट काउंटरवरील कर्मचारी प्रत्येक प्रवाशाकडून एका तिकिटामागे ३० रुपये अधिकचे उकळतोय. यावरून तो त्या एका कर्मचाऱ्याला विचारतो की, तुम्ही प्रत्येक प्रवाशाकडून एका तिकिटामागे ३० -३० रुपये एस्क्ट्रा का घेत आहात. त्यावर तो कर्मचारी आधी तिकीट काढलेल्या प्रवाशाला तिकीट दाखव, असे म्हणत त्याचे ३० रुपये परत करतो. पण, त्याने अशा प्रकारे याआधी अनेक प्रवाशांकडून प्रत्येक तिकिटामागे ३० रुपये अधिकचे वसूल केले होते.

त्यामुळे प्रश्न विचारणारा प्रवासी पुन्हा तोच प्रश्न करत म्हणतो की, आधी तुम्ही दोन जणांकडून अधिकचे पैसे घेतले आणि आता या प्रवाशाकडूनही घेत होता. त्यावर तो कर्मचारी त्या प्रवाशाच्या प्रश्नांना बगल देत बाजूला होण्यास सांगतो आणि त्यानंतर चुकून झाले, असे म्हणतो. त्यावर प्रवासी त्याला पुन्हा ठणकावून विचारतो की, तुमच्याकडून हे एकदा-दोनदा चुकून होऊ शकते; पण सतत का होतेय? यावर तो कर्मचारी आपला गुन्हा लपवण्यासाठी काहीच उत्तर न देता, प्रवाशालाच काउंटरवरून बाजूला होण्यास सांगतो. पण, तो प्रवासी बाजूला न होता, वारंवार त्याला विचारतो की, चुक एकदा होऊ शकते ना; वारंवार कशी होऊ शकते. यावर तो कर्मचारी तुझ्याकडून तर अधिकचे पैसे घेतले नाही ना, असे उलट उत्तर देतो. त्यावर ज्या प्रवाशाकडून कर्मचाऱ्याने ३० रुपये अधिकचे घेतले, तो म्हणतो संतापून म्हणतो की, मी मागितल्यावर तू माझे ३० रुपये परत दिसेल. अशा प्रकारे कर्मचाऱ्याने एकामागून एक आलेल्या तीन प्रवाशांकडून प्रत्येकी ३० रुपये अधिकचे घेतले. कल्याण रेल्वे स्टेशन तिकीट काउंटरवरील हा कर्मचारी प्रयागराजचे तिकीट काढणाऱ्या प्रवाशांकडून एका तिकीटमागे ३० रुपये अधिकचे वसूल करीत असल्याचा दावा व्हिडीओ शूट करणाऱ्या प्रवाशाने केला. पण तो फक्त प्रयागराजला जाणाऱ्या प्रवाशांकडूनच अशाप्रकारे अधिकचे पैसे वसूल करतोय की इतरही प्रवाशांकडून त्याने असे पैसे वसूल केले याबाबत चौकशी झाली पाहिजे अशी मागणी आता केली जात आहे. प्रवाशांनी या कर्मचाऱ्याविरोधात तीव्र संताप व्यक्त करीत कडक कारवाईची मागणी केली आहे.



# नालंदा बुद्ध विहारात माता रमाई आंबेडकर यांची जयंती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / कल्याण :त्यागमूर्ती माता रमाई मुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर उंच विद्वत्तेच्या शिखरापर्यंत पोहोचले असे प्रतिपादन प्रा.डॉ.आर.आर कसबे यांनी केले. भारतीय बौद्ध महासभा शाखा नालंदा बुद्ध विहार सम्राट अशोक नगर उंबर्डे कल्याण पश्चिम येथील त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची १२७ व्या जयंती निमित्ताने ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थित म्हणून रमाई कादंबरीकार केंद्रीय शिक्षिका लता शिंदे, शाखेचे अध्यक्ष राजू काऊतकर, प्रतिभा शिरसाट, स्वाती आघाम, कविता काऊतकर, वैशाली गोंडगे, सुंदर काऊतकर, ऍड.आम्रपाली भालेराव आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रमुख वक्ते डॉ.आर.आर. कसबे यांनी त्यागमूर्ती माता रमाई यांच्या संपूर्ण जीवनावर विविध पैलूवर भाष्य करत सर्व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अजय मगरे, रोशन गायकवाड, शरद गोंडगे, रंगोली मोरे, सुनीता गोंडगे, कोमल वाटुरे, मंगल वाघमारे, आरती मगरे यांनी विशेष परिश्रम घेतले. तर सर्व उपस्थितांचे प्रतिभा शिरसाट यांनी आभार मानले.



# एमडी ड्रग्ज प्रकरणी पदवीधर तरुणास अटक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : दिनांक 08/02/2025 रोजी रात्री 01.58 सुमारास स्कलर सिटी बिल्डिंग नंबर 17 रूम नंबर 103, काटकर पाडा बोईसर ता. जि. पालघर या ठिकाणी आरोपी अमान नईम मुराद वय 29 वर्षे सध्या राहणार वसई हकीम मोहल्ला ता.वसई जी. पालघर मुळ राहणार मनोर बाणेघर मनोर ता.जि. पालघर याने मानवी आरोग्यास अपायकारक असलेला प्रतिबंधित मेफेड्रोन (Mephedrone) नावाची पिवळसर पांढरट रंगाची पावडर अमली पदार्थ 1208 ग्रॅम वजनाची व त्यासाठी लागणारे साहित्य असे एकूण 2,42,07,202 रुपये अक्षरी दोन कोटी बेचाळीस लाख सात हजार दोनशे दोन रुपयाच्या किमतीचा विक्री करण्याचे उद्देशाने निर्मिती करताना आढळून आला आहे म्हणून त्याच्याविरुद्ध बोईसर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.४७/२०२५ गुंगीकारक औषधी द्रवे व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधी. 1985 चे कलम 21,22,8(क ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आले असून दि.११.०२.२०२५ पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी दिली आहे. पुढील तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे सपोनि/ व्हटकर हे करत आहेत.

# हिंदुत्वाची सत्ता : मलंगगड प्रश्न सोडवा

## लाखोंच्या संख्येने हिंदूंनी मलंगड यात्रेसाठी गडावर पोहोचण्याचे शिवसेना ठाकरे गटाचे आवाहन

## - जेष्ठ शिवसैनिक बाळ हरदास



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : केंद्रात व राज्यात हिदुत्वावादी सरकार आहे तर मग त्यांनी श्री मलंगगड प्रश्न सोडवून दाखवावा असे आव्हांन जेष्ठ शिवसैनिक बाळ हरदास यांनी दिले आहे. मलंगगड यात्रा 12 फेब्रुवारी पासून सुरुवात होणार असून त्या निमित्ताने उध्दव ठाकरे गटाच्या वतीने कार्यकर्ता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मलंग यात्रेच्या निमित्ताने लाखो शिवसैनिकांनी आणि हिंदूंनी मलंगडावर उपस्थित राहण्याचे आवाहन ठाकरेंच्या शिवसेनेकडून आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आले.

यावेळी बैठकीला उपनेते अल्ताफ शेख, जिल्हा प्रमुख धनजंय बोडारे, जिल्हा प्रमुख अँड अल्पेश भोईर, भिवंडी लोकसभा प्रमुख साईनाथ तारे, तात्या माने, जेष्ठ शिवसैनिक बाळ हरदास, उपजिल्हा प्रमुख विजय काटकर, शहरप्रमुख सचिन बासरे, विश्वास थळे, सोन्या पाटील, रवींद्र कपोते, दया शेट्टी, शरद पाटील, वंडार कारभारी, दिनेश शेटे, बाळा परब, अभिजीत सावंत, वैशाली दरेकर, अंजली राऊत यांच्या सह शिवसैनिक, महिला आघाडी, युवासैनिक उपस्थित होते.

यावेळी जेष्ट शिवसैनिक बाळ हरदास यांनी सांगितले की शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार 1988पासून श्री मलंगगड लढा धर्मवीर आनंद दिघे यांनी सुरु केला. हिंदुत्वासाठी लढा फक्त शिवसेनाच देवु शकते. ज्या ज्या ठिकाणी अन्याय होतो तेथे बाळासाहेबांची शिवसेना धावुन जाते मग तो दुर्गाडी लढा असो वा श्री मलंगगड लढा. आम्ही हा लढा शेवटपर्यंत लढु आणि नक्की आम्हाला यश येईल, तसेच केंद्रात व राज्यात महायुतीची व हिंदुत्वाची सत्ता आहे तर मग त्यांनी श्री मलंगगडाचा प्रश्न सोडवावा तसेच मलंगडच्या अनेक समस्या आहेत त्या सोडविल्या पाहिजेत असे सांगितले.

# साखर लोकांकडून मिळवा

## शिक्षकांपुढे यक्ष प्रश्न | शालेय पोषण आहारातून साखर गायब

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : ठाणे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील शाळांच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मध्यान्ह पोषण आहारातील साखर गायब झाल्याने पोषण आहारात गोड खिचडी आणि नाचणी सत्व कसे द्यायचे, असा प्रश्न शिक्षकांसमोर उभा राहिला आहे. साखर लागलीच तर प्रत्येक शाळेने गावातून लोकसहभागातून उपलब्ध करुन घ्यावी, असे स्पष्ट आदेशच देण्यात आल्याने आता साखरेसाठी शिक्षक गावागावात दानशूर व्यक्तींचा शोध घेऊ लागले आहेत. मात्र शहापूर सारख्या आदिवासी बहुल, दुर्गम वाड्यावस्त्यांच्या भागात साखरेसाठी शिक्षकांनी पायपीट करायची कशी ? असाही प्रश्न सतावू लागला आहे.

शालेय विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या मध्यान्ह पोषण आहाराच्या उपक्रमातून विविध पाककृतीतून आहार दिला जातो. मात्र या पोषण आहारासाठी लागणाऱ्या साखरेच्या निधी खर्चाला मान्यता देण्यात आलेली नाही. प्रत्यक्ष निधीसोबतच अतिरिक्त निधी देण्यासही शिक्षण विभागाने नकार दिला आहे. साखरेची उपलब्धता लोकसहभागातून करण्यास सांगण्यात आल्याने शिक्षकांनी या निर्णयाचा कडाडून विरोध केला आहे.

चालू शैक्षणिक वर्षात शालेय पोषण आहारात आठवड्यातून २ वेळा गोड पदार्थ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यात गोड खिचडी आणि नाचणी सत्व या २ पाककृतींचा समावेश देण्यात आला आहे. परंतु, यासाठी लागणारी साखर शाळा व्यवस्थापन समितीने लोकसहभागातून मिळवावी, असे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे साखर गोळा करायला शाळा व्यवस्थापन समितीसह शिक्षकांना गावभर भटकावे लागते की, काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शहापूर तालुक्यात पहिली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्यात येतो.

> प्रथम गोड खीर ठरली होती. आता मेनू मध्ये बदल करून गोड खिचडी देण्याचे परिपत्रक आहे. वाडी वस्तीवरील शाळेमध्ये गोड खिचडीसाठी लोकसहभागातून साखर गोळा करणे अवघड आहे.
> -संदीप भोईर, कार्याध्यक्ष, प्राथमिक शिक्षक समिती

> पोषण आहारात साखर देण्यासाठी निधीची तरतूद नाही. त्यामुळे शिक्षकांना व शाळा व्यवस्थापन समितीला गावपातळीवर साखरेची व्यवस्था करण्यास सांगण्यात आले आहे.
> - भाऊसाहेब चव्हाण, गटशिक्षणाधिकारी

# उबाठा गटाची उल्हासनगर आयुक्तांची भेट



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : शहरातील विविध नागरी समस्या सोडवणुकीसाठी उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेना जिल्हाप्रमुख धनंजय बोढारे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने नवनियुक्त आयुक्त मनीषा आव्हाळे यांची भेट घेतली.

शहरातील पिण्याच्या पाण्याची समस्या, पाईपलाईन, पाईपलाईनमुळे होणारी जटील समस्या, शहरातील कचरा, खोदून ठेवलेले रस्ते, तुंबलेल्या गटारी, खोळंबली रहदारी, या जटिल समस्यांनी नागरिक त्रस्त आहेत. तातडीने या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आयुक्तांना भेटून शिष्ठ मंडळाने समस्यांची माहिती दिली. या वेळी शहरप्रमुख कुलविंदरसिंग बैस यावेळी उपजिल्हा प्रमुख राजेंद्र साहू, दिलीप मिश्रा, राधाचरण करोतिया, प्रकाश चौधरी भगवान मोहिते, उपशहरप्रमुख सुरेश पाटील, शिवाजी जावळे, राजू माने, आबा सावंत आदी उपस्थित होते.

# अंमली पदार्थ विशेष पथकाची कारवाई



**४ जण ताब्यात**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण परीमंडळ ३ मध्ये अवैध धंदयावर कारवाई करण्याकरीता पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक स्थापन करण्यात आले असुन या पथकातील पोलीस उपनिरीक्षक प्रसाद चव्हाण व पोलीस पथक हे संयुक्तरित्या खाजगी वाहनाने गस्त करीत असताना मानपाडा पोलीस स्टेशन हददीत सुदर्शन मार्बल समोर, सावित्रीबाई फुले नाटयगृह येथे एक इसम सनिल श्रीनाथ यादव, वय २५ वर्ष हा त्याच्या ताब्यात एकुण ८.४८ ग्रॅम वजनाचा १६ हजार ५०० रूपये किंमतीचा एम.डी. हा अंमली पदार्थ विक्री करण्याचे उददेशाने जवळ बाळगलेला मिळुन आल्याने त्याच्यावर मानपाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाजारपेठ पोलीस स्टेशन हददीत दुर्गामाता चौक येथील मोकळया जागेत शंकर महादेव गिरी, वय ४६ वर्षे, हा त्याच्या ताब्यात एकुण ९ किलो ९५० ग्रॅम वजनाचा १ लाख रूपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ विक्रीसाठी जवळ बाळगलेला मिळुन आल्याने त्याच्यावर बाजारपेठ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डोंबिवली पोलीस स्टेशन हददीत राजाजी पथ, स्वामी नारायण मंदिरा बाजुस असलेल्या मोकळया जागेत सचिन कावळे, वय ३२ वर्षे, अमन गुप्ता उर्फ पप्पु, वय १६ वर्षे, यांनी मिळुन त्यांच्या ताब्यात एकुण २३.५३ ग्रॅम वजनाचा एम.डी. हा अंमली पदार्थ व १० ग्रॅम वजनाचा चरस हा अंमली पदार्थ एकुण ९३ हजार ९४३ रूपये किंमतीचा अंमली पदार्थ विक्रीसाठी सोबत बाळगल्याने त्यांच्यावर डोंबिवली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच परिमंडळ ३ कल्याण मध्ये १ जानेवारी ते आजपर्यंत विशेष अंमली पदार्थ कारवाई पथकामार्फत अंतर्गत एकुण १३ गुन्हे दाखल असुन या गुन्हयात १९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडुन ६३ ग्रॅम एम. डी. पावडर, २३२ कोडीनयुक्त बॉटल व नशेच्या गोळ्या तसेच ४७ किलो ४४ ग्रॅम वजनाचा गांजा असा एकुण १२ लाखापेक्षा जास्त रुपये किमतीचा अंमली पदार्थ मुद्देमाल हस्तगत केला आहे.

हि कारवाई पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि प्रशांत चव्हाण, पोना शांताराम कसबे, पोशि गौतम जाधव, राजेंद्र सोनावणे यांच्या विशेष पथक तसेच डोंबिवली पोलीस ठाणेचे वपोनि जावदवाड, सपोनि कोकरे, मानपाडा पो.स्टे.चे पोनि गुंड, सपोनि राळेभात व बाजारपेठ पोलीस ठाणेचे पोनि दुकले, सपोनि राठोड यांच्याकडुन कामगिरी करण्यात आली आहे.

# जिल्ह्यात 'आरटीई' प्रवेशासाठी २५ हजार ७७३ अर्ज दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : 'आरटीई' अंतर्गत २५ टक्के जागांवरील प्रवेशासाठी ठाणे जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती व महानगर पालिका अंतर्गत एकूण ६२७ पात्र शाळा असून एकूण ११ हजार ३२६ रिक्त जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी अंतिम २५ हजार ७७३ अर्ज आले आहेत. आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सोडत (लॉटरी) कार्यक्रम सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना विविध वाहिन्यांवर लाईव्ह पाहता यावा यामुळे दि. १० फेब्रुवारी, २०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) पुणे येथे काढण्यात येणार असून सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (आरटीई) कायद्या अंतर्गत वंचित, दुर्बल व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग घटकातील मुलांना खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागांवर मोफत प्रवेश दिले जाते.

पालकांसाठी मदत केंद्रांची यादी (Help Centers), ऑनलाईन प्रक्रियेत अर्ज नोंदणी बाबत मार्गदर्शक पुस्तिका (User Manual), आवश्यक कागदपत्रे इत्यादी बाबत सर्व माहिती शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, अशी माहिती शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी दिली.

# किशोरवयीन मुलींचे समुपदेशन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण : शहापूर तालुक्यात वेदांत फाऊंडेशन आणि कॉनकास्ट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने. किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी जागरूकता आरोग्य उपक्रम राबविण्यात आला कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या सीएसआर अंतर्गत वेदांत फाऊंडेशन ने या उपक्रमांतर्गत एकूण ५५७ किशोरवयीन मुलींना मासिक पाळी संदर्भातील आवश्यक जागरूकता प्रदान केली यावेळी सॅनिटरी पॅडचे वाटप केरण्यात आले या शिबिरात जवळपास २०६ लोकांची विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून आरोग्य तपासणी करण्यात आली.शहापूर तालुक्यातील विविध भागांमध्ये हा उपक्रम वेदांत फाऊंडेशन मार्फत व्यापकपणे राबविला गेला हे आरोग्य शिबिर शहापूर तालुक्यातील सावरोली, शेणवा, वेहळोली, पाषाणे ,टहारपुर, बोरशेती, आटगाव, आसनगाव आणि माहुली परिसरात आयोजित करण्यात आले होते. वेदांत फाऊंडेशनचे संचालक कैलास भावसार व दिपाली भावसार यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.दुर्गम भागातील लोकांना आवश्यक आरोग्य सेवा आणि ज्ञान पुरवून सशक्त बनवणे,हे महत्त्वाचे उद्दिष्ट संस्थेचे असल्याचे सांगण्यात येत आहे.

# आशेळे गावातून वीस बांग्लादेशींना अटक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर - कल्याण हद्दिवरील आशेळे गावातील कृष्णा नगरमधून अनधिकृतपणे राहणाऱ्या एका बांगलादेशी नागरिकांला पोलिसांनी गुरुवारी अटक केलीय. गेल्या दोन महिन्यात उल्हासनगर क्राईम ब्रांच ने २० बांगलादेशी नागरिकांवर कारवाई केलीय. त्यामुळे आशेळे गाव हे बेकायदेशीर पुणे राहणाऱ्या बांगलादेशींचा अड्डा बनतंय की काय , असा प्रश्न आता निर्माण झालाय.

उल्हासनगर गुन्हे शाखेने गुरुवारी आशेळे गावातील कृष्णा नगर मध्ये रूम मध्ये धाड टाकून अनधिकृतपणे व व्हिसा विना राहणाऱ्या शहाजान दुलाल मुल्ला या ३५ वर्षीय व्यक्तीला विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक केलीय. तसेच त्याला राहण्यासाठी आश्रय देणाऱ्या रूम मालकावर देखील कारवाई केली जाणार आहे,मागील दोन वर्षांपासून हा व्यक्ती विनापरवाना आशेळे गाव याठिकाणी राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिलीय.

# नंदू शिंदे यांना थायलंड येथे रांगोळीचा पहिला मान



## रांगोळीचे केले थायलंडचे गव्हर्नर सुफोन सुवन्नारात यांनी केले कौतुक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : थायलंड पुकेट येथे लॉर्ड श्रीमंत गणपती बाप्पा देवालय, या मंदिरात श्री गणेश जयंती निमित्त ट्रॅडिशनल रांगोळी भारतीय परंपरा नुसार संस्कार भरती ही रांगोळी काढली..या मंदिराचा हा पहिलाच कार्यक्रम पार पडला मुरबाड तालुक्यातील शिरगावचे सुपुत्र नंदू शिंदे यांना पहिलीच रांगोळी काढण्याचा मला मिळाला..या मंदिराचा उद्घाटन एक महिन्यापूर्वीच झाला होता..आणि पहिला श्री गणेश जयंती आपल्या भारतीय परंपरेनुसार पार पडला या कार्यक्रमासाठी तिथले गव्हर्नर उपस्तिस्त होते व थायलंड गव्हर्नरन सुफोन सुवन्नारात यांने कलाकार नंदू शिंदे यांनी काढलेल्या रांगोळीचे केले कौतुक पुढे फ्रान्स, थायलंड परत इतर देशात रांगोळीचा कार्यक्रम होणार आहे अशी माहिती रांगोळी कलाकार नंदू शिंदे यांनी दिली आहे. त्यामुळे भारतीय रांगोळी कलाकार नंदू शिंदे यांना थायलंडमध्ये लॉर्ड श्रीमंत गणपती बाप्पा देवलाय या मंदिरात भारतीय परंपरा नुसार रांगोळी काढण्याचा पहिलाच मान मिळाल्यामुळे सर्वत्र रांगोळी कलाकार नंदू शिंदे यांचे अभिनंदन होत आहे.

फोटो कॅप्शन मध्ये थायलंडचे गव्हर्नर यांच्या सोबत रांगोळी कलाकार नंदू शिंदे दिसत आहे.

# फळेगाव येथे महाआरोग्य शिबीर संपन्न




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील कैलासवासी भागुबाई गोमा जाधव यांच्या स्मरणार्थ भागुबाई जीवन प्रेरणा सामाजिक संस्था फळेगाव व नवयुग मित्र मंडळ तळेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच चिंतामणी हॉस्पिटल मल्टी स्पेशलिटी अँड ड्रामा युनिट यांच्या तर्फे मोफत महाआरोग्य व नेत्र तपासणी शिबिर नुकतेच फळेगाव येथे मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये उद्घाटन करून संपन्न झाले राष्ट्रसंत परम गुरुदेव श्री नम्रमुनी महाराज साहेब परम धाम आश्रम वाळकस यांच्या विशेष सहकार्याने रुग्णांना सोलापुरी चादरी वाटप यावेळी करण्यात आले शिबिराचे उद्घाटन फळे गाव त्या प्रथम नागरिक सरपंच भारतीताई रविकांत पाटील तसेच कल्याण तालुका शिवसेनाप्रमुख वसंत लोने भाजपा जेष्ठ कार्यकर्ते मुरली चौधरी रमेश बांगर माजी उपसभापती पंचायत समिती कल्याण आदेश चौधरी ज्येष्ठविधी सल्लागार एडवोकेट अल्पेश भोईर ग्रामपंचायत सदस्य प्रवीण ढोले माजी सरपंच रवींद्र जाधव रविकांत चौधरी दिनेश चौधरी नंदा बाळा जाधव चंद्रकांत भोईर बाळाराम जाधव यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष संजय गोमा जाधव सचिव निरा जाधव उपाध्यक्ष कातडे सर सदस्य महेंद्र चंदे ज्ञानेश्वर सातपुते राहुल चौधरी अशा विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम पार पडला

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024